# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

# "छात्रपरिषद उद्घाटन सोहळा"

# अहवाल

---

दिनाांक :- १० डिसेंबर,२०२५

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे अत्यंत उत्साहपुर्ण व शिस्तबद्ध पद्धतीने छात्रपरिषद उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्राचार्य अध्यक्षा मा.डॉ.रमा भोसले आणि सर्व प्राध्यापक वृंद आणि छात्रपरिषद सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन, दीपप्रज्वलाने करण्यात आली. मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते, कार्यक्रमाचे आयोजिका मा.प्रा.डॉ.प्रियांका सुभेदार तसेच सर्व प्राध्यापक वृंदांच्या उपस्थितीत पूजन विधी पार पडला. सरस्वती पूजनानंतर प्राचार्य, सर्व प्राध्यापक वृंद यांचे औपचारिक स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती.स्मितल कुरूप यांनी करून छात्रपरिषद स्थापनेचे महत्त्व, तिची उद्दिष्टे आणि तिच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांचा विकास कसा साधला जाऊ शकतो, याविषयी मार्गदर्शन केले.

त्यानंतर मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते छात्रपरिषद नामफलकाचे अनावरण करण्यात आले. नामफलक अनावरणानंतर नवनिर्वाचित छात्रपरिषद सदस्यांचा अभिनंदन सोहळा आणि शपथविधी पार पडला. सर्व सदस्यांनी छात्रपरिषद पदाची शपथ घेत, आपली जबाबदारी निष्ठेने पार पाडण्याचा संकल्प केला.

तसेच मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी अध्यक्षीय भाषण केले. त्यांनी छात्रपरिषदेच्या भूमिकेवर प्रकाश टाकत, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि सामाजिक बांधिलकी यांचा परिपोष कसा होतो, याविषयी मार्गदर्शन केले. व त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी उपस्थितांना नवीन उत्साह मिळाला.

कार्यक्रमाच्या शेवटी श्रीमती. अनघा म्हात्रे यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी सर्व मान्यवर, प्राध्यापक वृंद, छात्रपरिषद सदस्य आणि विद्यार्थ्यांचे सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विशाल गावित यांनी उत्तम प्रकारे पार पाडले. छात्रपरिषद उद्घाटन सोहळा अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. या सोहळ्यातून विद्यार्थ्यांना नेतृत्व, जबाबदारी आणि संघटन कौशल्य यांची जाणीव झाली. तसेच, नव्या छात्रपरिषद सदस्यांना पुढील कार्यासाठी प्रेरणा मिळाली. संपूर्ण कार्यक्रम उत्तम व्यवस्थापन आणि उत्साही वातावरणात पार पडल्याने उपस्थितांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले.


शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.
( शैक्षणिक वर्ष २०२५-२६ )
छात्र परिषद उद्घाटन सोहळा
निमंत्रण पत्रिका
आपणास कळविण्यात आनंद होत आहे की, दिनांक - १० डिसेंबर, २०२५ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे "छात्र परिषद उद्घाटन सोहळा" आयोजित केलेला आहे. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.
समन्वयक
मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार
अध्यक्ष
मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले
प्रमुख उपस्थिती
मा. प्रा. बिजली दडपे
मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे
मा. प्रा. डॉ. उज्वला डोणे
स्थळ : सरस्वती कक्ष
वेळ : सकाळी ११.१५ वाजता


शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल
(शैक्षणिक वर्ष : २०२५-२६ )
छात्र परिषद उद्घाटन सोहळा
कार्यक्रम पत्रिका

| | |
|---|---|
| सरस्वती पूजन आणि द्वीप प्रज्वलन | मा. प्राचार्य व प्राध्यापक वृंद |
| स्वागत व प्रास्ताविक | श्रीमती.स्मितल कुरूप |
| नाम फलकाचे अनावरण | मा. प्राचार्य यांच्या हस्ते |
| सत्कार / अभिनंदन | छात्रपरिषद |
| शपथविधी | छात्रपरिषद |
| अध्यक्षीय भाषण | मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले |
| आभार | श्रीमती.अनघा म्हात्रे |
| सूत्रसंचालन | श्री. विशाल गावित |

स्थळ : सरस्वती कक्ष
दि. १० डिसेंबर २०२५ वेळ : सकाळी ११:१५

# छायाचित्रे:-




महाविद्यालयाच्या प्राचार्य मा. डॉ. रमा भोसले आणि सर्व प्राध्यापक वृंद सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलन करताना.




कार्यक्रमाच्या समन्वयक मा.प्रा.डॉ. प्रियांका सुभेदार, महाविद्यालयाच्या प्राचार्य व छात्रपरिषदेच्या अध्यक्षा मा. डॉ. रमा भोसले यांचं पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना.




द्वितीय वर्ष छात्राध्यापिका श्रीमती. स्मितल कुरूप "छात्र परिषद उद्घाटन सोहळ्याचे"प्रास्ताविक करताना. आणि नवनिर्वाचित सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत करताना.




महाविद्यालयाच्या प्राचार्य मा. डॉ. रमा भोसले आणि कार्यक्रमाच्या आयोजीका मा.डॉ.प्रियांका सुभेदार नामफलकाचे अनावरण करताना. समवेत सर्व प्राध्यापक वृंद आणि छत्रपरिषदेचे नवनिर्वाचित सदस्य




मा. प्राचार्य डॉ.रमा भोसले यांच्या हस्ते सभापती या पदासाठी नवनिर्वाचित सदस्य प्रथम वर्षीय छात्राध्यापक नितीन कवाड यांचं पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना.




प्रथम वर्षीय छात्राध्यापक नितीन कवाड सभापती या पदासाठी शपथ घेताना.




मा. प्राचार्य डॉ.रमा भोसले यांच्या हस्ते सचिव या पदासाठी नवनिर्वाचित सदस्य प्रथम वर्षीय छात्राध्यापिका शिवानी डोईफोडे यांचं पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना.




प्रथमवर्षीय छात्राध्यापिका शिवानी डोईफोडे सचिव पदासाठी शपथ घेताना.




**प्रथम वर्षीय छात्राध्यापिका नेहा लहाने यांचं वर्ग प्रतिनिधी या पदासाठी मा. डॉ. नीलिमा मोरे पुष्प देऊन अभिनंदन करताना.**




**प्रथम वर्षीय छात्राध्यापिका नेहा लहाने वर्ग प्रतिनिधी या पदासाठी शपथ घेताना.**




**द्वितीय वर्ष छात्राध्यापक रोहन भोईर यांचं वर्ग प्रतिनिधी या पदासाठी मा. डॉ. प्रियांका सुभेदार पुष्प देऊन अभिनंदन करताना.**




**द्वितीय वर्ष छात्राध्यापक रोहन भोईर वर्ग प्रतिनिधी या पदासाठी शपथ घेताना.**




**प्रथम वर्षीय छात्राध्यापिका वंदना वणवे यांचं वर्ग महिला प्रतिनिधी या पदासाठी मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे पुष्प देऊन अभिनंदन करताना.**




**प्रथम वर्षीय छात्राध्यापिका वंदना वणवे महिला प्रतिनिधी या पदासाठी शपथ घेताना.**




**प्रथम वर्षीय छात्राध्यापिका स्वाती म्हैसमाळे यांचं मागासवर्ग प्रतिनिधी या पदासाठी मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार पुष्प देऊन अभिनंदन करताना.**




**प्रथम वर्षीय छात्राध्यापिका स्वाती म्हैसमाळे मागासवर्ग प्रतिनिधी या पदासाठी शपथ घेताना.**




द्वितीय वर्ष छात्राध्यापक आकाश राठोड यांचं क्रीडा प्रतिनिधी या पदासाठी मा. प्राचार्य. डॉ. रमा भोसले पुष्प देऊन अभिनंदन करताना.




द्वितीय वर्ष छात्राध्यापक आकाश राठोड क्रीडा प्रतिनिधी या पदासाठी शपथ घेताना.




प्रथम वर्षीय छात्राध्यापिका तेजल भोईर यांच सांस्कृतिक प्रतिनिधी या पदासाठी मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार पुष्प देऊन अभिनंदन करताना.




प्रथम वर्षीय छात्राध्यापिका तेजल भोईर सांस्कृतिक प्रतिनिधी या पदासाठी शपथ घेताना.







प्रथम वर्षीय छात्राध्यापिका प्रणोती कांबळे राष्ट्रीय छात्रसेना प्रतिनिधी या पदासाठी मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे पुष्प देऊन अभिनंदन करताना.

प्रथम वर्षीय छात्राध्यापिका प्रणोती कांबळे "राष्ट्रीय छात्रसेना प्रतिनिधी" या पदासाठी शपथ घेताना.







द्वितीय वर्ष छात्राध्यापिका रुचिता बाळू सुतार यांच राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधी या पदासाठी मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार पुष्प देऊन अभिनंदन करताना.

द्वितीय वर्ष छात्राध्यापिका रुचिता बाळू सुतार राष्ट्रीय सेवा योजना प्रतिनिधी या पदासाठी शपथ घेताना.




महाविद्यालयाच्या प्राचार्या व छात्र परिषदेच्या अध्यक्षा मा. डॉ. रमा भोसले यांनी छात्रपरिषदेच्या भूमिकेवर प्रकाश टाकत, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि सामाजिक बांधिलकी यांचा परिपोष कसा होतो, याविषयी मार्गदर्शन करत नवनिर्वाचित सदस्यांना शुभेच्छा दिल्या.




द्वितीय वर्ष छात्राध्यापिका अनघा म्हात्रे कार्यक्रमाचे आभार प्रकटीकरण करताना.




प्रथम वर्ष छात्राध्यापक विशाल गावित कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन करताना.




प्रथम वर्ष छात्राध्यापक यश पाटील यांनी काढलेली रांगोळी.